RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१४ मंगळवार एप्रिल २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक ३१८
✲ पृष्ठ : ६ ✲ मूल्य रु : ३



समता, बंधुता आणि न्यायाचा मार्ग दाखविणाऱ्या महासूर्याला विनम्र अभिवादन!
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**




# आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती

## देशभरात लाखो अनुयायी करणार अभिवादन! ठिकठिकाणी जय्यत तयारी





**▸विदर्भ केसरी। मुंबई:**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपूरसह मुंबईमध्ये लाखो अनुयायी येत असतात. यावर्षी 135 वी जयंती साजरी केली जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी 13 एप्रिलपासूनच मोठ्या प्रमाणावर चैत्यभूमी, दादर येथे दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे मुंबई वाहतूक पोलिसांनी चैत्यभूमी आणि आसपासच्या परिसरातील वाहतुकीमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अनेकांना आपल्या दैनंदिनी मार्गाऐवजी पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दादरच्या चैत्यभूमीवर लाखो भीम अनुयायी एकत्र येत असतात. भीम अनुयायी एकत्र येत असल्यामुळे चैत्यभूमी आणि परिसरामध्ये आजपासून 14 एप्रिलच्या मध्यरात्रीपर्यंत वाहतुकसंबंधितचे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, 13 एप्रिल आणि 14 एप्रिल रोजी, अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद केले जाणार आहेत किंवा ज्या ठिकाणी वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर अडचण असेल, त्या रस्त्यावर एकेरी मार्ग चालवला जाणार आहे. त्या रस्त्यांमध्ये एसव्हीएस रोड, रानडे रोड, ज्ञानेश्वर रोड आणि एस.के.बोले रोड यांचा समावेश आहे.

सिद्धिविनायक मंदिरापासून येस बँक जंक्शनपर्यंत आणि एसव्हीएस रोड सुद्धा बंद राहणार आहे. ज्ञानेश्वर मंदिर रोड, एसव्हीएस रोड आणि येस बँक जंक्शनपासून दादर चौपाटीपर्यंतचा रस्ता सुद्धा बंद राहणार आहे. याशिवाय, एस.के.बोले रोड, सिद्धिविनायक मंदिरापासून पोर्तुगीज चर्चपर्यंतचा रस्ता एकेरी वाहतुकीसाठीच खुला राहणार आहे. या काळात दादरमधील अनेक रस्त्यांना नो-पार्किंग क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. वीर सावरकर मार्ग (सेंच्युरी जंक्शन ते येस बँक जंक्शन), रानडे रोड, केळुस्कर रोड आणि ज्ञानेश्वर मंदिर रोड. या ठिकाणी नो पार्किंग एरिया म्हणून घोषित करण्यात आला आहे. तर, माहीम ते दादरपर्यंत सेनापती बापट मार्ग, इंडिया बुल्स फायनान्स सेंटर, कोहिनूर स्क्वेअर पीपीएल, कोहिनूर मिल कंपाऊंड, कामगार स्टेडियम आणि माटुंग्यातील पाच उद्यानांमध्ये पार्किंग एरिया घोषित करण्यात आला आहे


















दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू



# बारदाणा टंचाईसाठी 'नाफेड'च जबाबदार

## पणन मंडळाच्या पत्रांना केराची टोपली; भूषण कुंटे यांचा आरोप



**▶विदर्भ केसरी। सतीश भालेराव नागपूर :-**

"नागपूर जिल्ह्यात चणा खरेदीसाठी आ वश्यक असलेल्या बारदाण्या च्या (Gunny Bags) तीव्र तुटवड्यामुळे सरकारी खरेदी प्रक्रिया ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. या परिस्थितीला सर्वस्वी 'नाफेड' (NAFED) प्रशासन जबाबदार असून त्यांच्या ढिसाळ नियोजनाचा फटका विदर्भातील शेतकऱ्यांना बसत आहे," असा घणाघाती आरोप महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुंटे यांनी केला आहे.

या गंभीर प्रश्नावर भूषण कुंटे यांनी आज महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (MSAMB), विभागीय कार्यालय, नागपूर येथे भेट देऊन उपव्यवस्थापक श्री. राजेश सरोदे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून अनेक धक्कादायक तांत्रिक बाबी समोर आल्या आहेत.

चर्चेतील महत्त्वाचे मुद्दे: प्रशासकीय रचना: नागपूर आणि अमरावती विभागात नाफेडची स्वतःची २ ५ केंद्रे आहेत. नागपूर जिल्ह्यात प णन मंडळाची (MSAMB) २ ५ केंद्रे असून ती FPO आणि A PMC मार्फत चालवली जातात. खरेदी-विक्रीची जबाबदारी 'विदर्भ को -ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन' (V CMF) वर असून, नागपूर परिक्षेत्रात ६ DMO केंद्रे आहेत.

पत्रांना प्रतिसाद नाही: सरोदे यांनी माहिती दिली की, चणा खरेदीसाठी बारदाणा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे (मुख्य कार्यालय) यांना ईमेल आणि पत्राद्वारे वारंवार कळवले आहे. नाफेडमार्फत १५ दिवसांपूर्वीच ४० लाख बारदाण्याची ऑर्डर कोलकात्याच्या मॅन्युफॅक्चरर्सना देण्यात आली असून त्याचे पेमेंटही पूर्ण झाले आहे. मात्र, तरीही पुरवठ्यात विलंब होत आहे. पुरवठ्याची स्थिती: आजवर केवळ ३ ट्रक बारदाणा प्राप्त झाला आहे. D M O आणि VCMF साठी १ ला ख बारदाणा पुरवण्यात आला अस ला तरी, ५ लाखांची अतिरिक्त मा गणी अद्याप नाफेडकडे प्रलंबित आ हे . पणन मंडळाच्या स्वतःच्या केंद्रांकडे केवळ एक आठवडा पुरेल इतकाच साठा शिल्लक आहे.

शे त कऱ्यांची अडवणूक: शासन के व ळ २५% माल खरेदीचे उद्दिष्ट ठे व ते. त्यातही बारदाणा नसल्याने ख रे दी रखडल्यास शेतकऱ्यांना आप ला ७५% माल व्यापाऱ्यांना हमी भावापेक्षा कमी दराने विकावा लागतो. यातून व्यापाऱ्यांचे भले आणि शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. भूषण कुंटे यांचा इशारा: पणन मंडळ थेट बारदाणा खरेदी करू शकत नाही, सर्व पुरवठा नाफेडमार्फतच होतो. त्यामुळे या संपूर्ण गोंधळाला नाफेड जबाबदार असल्याचे श्री. सरोदे यांनी स्पष्ट केले आहे.

"शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नका. जर तातडीने बारदाणा उपलब्ध झाला नाही, तर महाराष्ट्र शेतकरी संघटना नाफेड आणि पणन प्रशासनाच्या विरोधात तीव्र जनआंदोलन छेडेल," असा इशारा भूषण कुंटे यांनी यावेळी दिला.

## प्रतिभा चाकणकरांची 8 तास चौकशी

**▶विदर्भ केसरी।**

नाशिकच्या गाजलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाचा तपास आता थेट राजकीय वर्तुळातील नातेसंबंधांपर्यंत पोहोचला असून, या प्रकरणातील चौकशीचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांची सोमवारी शिर्डी पोलिस ठाण्यात तब्बल ८ तास चौकशी करण्यात आली. समता पतसंस्थेतील कोट्यवधींच्या संशयास्पद व्यवहाराप्रकरणी ही चौकशी करण्यात आली. या चौकशीदरम्यान प्रतिभा चाकणकर यांनी धक्कादायक खुलासा करत, पतसंस्थेतील ती खाती बनावट असून सर्व सह्या खोट्या असल्याचा दावा केला आहे.समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे एकूण चार खाती असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. यात प्रतिभा यांच्या नावे दोन आणि त्यांचा मुलगा चिन्मय याच्या नावे दोन खाती आहेत. विशेष म्हणजे, या खात्यांमधून आतापर्यंत सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांची मोठी उलाढाल झाली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या सर्व खात्यांवर वारसदार (नॉमिनी) म्हणून मुख्य आरोपी अशोक खरात याचे नाव नोंदवण्यात आले आहे. याच संशयास्पद व्यवहारांचा धागा पकडून पोलिसांनी चाकणकर माय-लेकांचा जबाब नोंदवला.

## देवळी येथे मनसेचा पक्षप्रवेश सोहळा

**▶विदर्भ केसरी। राजहंस शेंडे,**



देवळी : राज ठाकरे यांच्या विचारप्रेरणेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा विस्तार ग्रामीण भागातही वेगाने होत असल्याचे चित्र देवळी येथे पाहायला मिळाले. दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात अनेक युवकांनी मनसेत प्रवेश करत पक्षाला बळकटी दिली. या कार्यक्रमास जिल्हा अध्यक्ष शेखर भाऊ दुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपाध्यक्ष (उमरेड विधानसभा) महादेवजी आंबोने, तालुका अध्यक्ष शिवपाल फेंडर, तालुका सचिव विजुभाऊ कस्तुरे, तालुका संघटक आकाश ठाकरे, वेलतूर सर्कल अध्यक्ष राजूजी कोल्हे तसेच तालुका संघटक संजयजी रामटेके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. शंकरजी समर्थ यांची उपतालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच रायबांजी खेडेकर (शाखाध्यक्ष), संतोषजी खेडेकर (विभाग अध्यक्ष), कृष्णाजी जांभुळे (शाखाध्यक्ष), नितेश खेडेकर (विभाग अध्यक्ष), मारुती उरकुटे (शाखाध्यक्ष) व माणिक खेडेकर (शाखाध्यक्ष) यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या. या सोहळ्यात बोलताना मान्यवरांनी सांगितले की, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवक मोठ्या प्रमाणावर मनसेकडे आकर्षित होत आहेत. गावपातळीवर संघटन मजबूत करण्यासाठी अशा नियुक्त्या महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. देवळी परिसरात झालेल्या या पक्षप्रवेशामुळे मनसेच्या संघटनात्मक ताकदीत भर पडली असून, आगामी काळात पक्ष अधिक प्रभावीपणे उभा राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## कमांडो योगेश्वर राठोड शिवणीकर यांना 'राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान"

### =राज्यस्तरीय राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मातृसम्मान पुरस्कार – 2026" ने सन्मानित

**▶विदर्भ केसरी। मोहदा प्रति :-विरेंद्र चव्हाण**



मोहदा:-राष्ट्रसेवा व समाजीक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल माजी पॅरा कमांडो श्री योगेश्वर राठोड यांना वर्ष 2026 चा "राज्यस्तरीय राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मातृसम्मान पुरस्कार" प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा सन्मान त्यांच्या समर्पण, कर्तव्यनिष्ठा, चिकाटी व निस्वार्थ सेवा भावनेची दखल घेऊन देण्यात आला. श्री राठोड यांनी भारतीय सैन्यात पॅरा कमांडो म्हणून सेवा बजावताना देशाप्रती आपली प्रामाणिकता, शिस्त व राष्ट्रभक्तीचे उत्तम उदाहरण घालून दिले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी समाजसेवेच्या क्षेत्रात सक्रिय राहून जनकल्याणाच्या विविध उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान दिले आहे. आपले मनोगत व्यक्त करताना श्री राठोड म्हणाले – "भारतीय सैन्यात सेवा करत असताना मी पूर्ण प्रामाणिकपणे व निस्वार्थ भावनेने देशाची सेवा केली आहे. आता त्याच सेवा भावनेतून समाजकल्याणासाठी कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**■ कर्तव्यनिष्ठा, चिकाटी आणि सेवा हेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे."**

**यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, भविष्यातही समाजहितासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनकल्याणाचे कार्य सतत सुरू ठेवणार आहेत.**

## संविधान विचार मंचा तर्फे महारक्तदान शिबिराचे आयोजन

**▶विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त स्थानिक यवतमाळ येथील संविधान चौक येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन संविधान विचार मंच यवतमाळ तर्फे करण्यात आले आहे. दरवर्षी या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष,युवक-युवती स्वेच्छेने रक्तदान करून बाबासाहेबांना कृतिशील अभिवादन करतात.

संविधान विचार मंचातर्फे दरवर्षी वर्षातून दोनदा महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. सद्य परिस्थितीत शासकीय रक्तपेढी येथे रक्ताचा प्रचंड तुटवडा आहे. प्रसूती रुग्णांसह इतर अन्य रुग्णांना मोठ्या प्रमाणावर रक्ताची गरज भासत असते. या रक्तदानातून निश्चितच अनेकांना जीवनदान मिळणार आहे.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सदर रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने रक्तदान करून बाबासाहेबांना कृतिशील अभिवादन करण्याचे आवाहन संविधान विचार मंचा तर्फे करण्यात आले आहे. सदर रक्तपुरवठा नेहमीप्रमाणे शासकीय रक्तपेढीस करण्यात येणार आहे.

## अग्रलेख

# भावपूर्ण श्रद्धांजली

'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख', 'ऋतू हिरवा, शूरा मी वंदिले', 'मलमली तारुण्य माझे', 'माँग के साथ तुम्हारा', 'उडे जब जब जुल्फें तेरी', 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा', 'दिल चीज क्या है', 'इन आँखो की मस्ती के','तन्हा तन्हा', 'याई रे', 'राधा कैसे न जले' अशा एकाहून एक अमीट सूरांची बरसात करणारा आशा भोसलेंचा मलमली आवाज रविवारी निमाला. भारतीय संगीत क्षेत्राचा मानबिंदू आणि कोट्यवधी संगीत रसिकांच्या आशाताई अर्थात सूरसम्राज्ञी आशा भोसले यांनी वयाच्या ९३ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अन्त झाला. शनिवारी संध्याकाळी आशाताईंना हृदयविकाराचा सौम्य झटका आला होता. त्यामुळे त्यांना तातडीने ब्रीच कॅन्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होईल अशी आशा व्यक्त केली जात होती. परंतु दुर्दैवाने त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. आशा भोसले यांनी सात दशकांहून अधिक काळ आपल्या आवाजाने चित्रपटसृष्टी गाजवली. केवळ मराठी आणि हिंदीच नव्हे तर विविध २० भाषांतून त्यांनी तब्बल १२ हजारहून अधिक गाणी गायली आहेत. शास्त्रीय संगीत, सुगमसंगीत, लावणीपासून ते पॉप म्युझिकपर्यंत सर्वच प्रकारांत त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. आशाताईंच्या निधनाने संपूर्ण बॉलिवूड आणि जागतिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. एका महान गायिकेच्या जाण्याने कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. विविध प्रकारची गाणी गाऊन त्यांनी आपले वेगळेपण वेळोवेळी सिद्ध केले होते. जुन्या काळातील अभिनेत्रींबरोबरच माधुरी, काजोलपर्यंत अनेक अभिनेत्रींसाठी त्यांनी पार्श्वगायन केले. पडद्यावरील कलाकाराला आपला आवाज सूट झाला पाहिजे हे डोळ्यासमोर ठेवून त्या पार्श्वगायन करायच्या, ही त्यांच्या पार्श्वगायनाची खासियत त्यांच्या लोकप्रियतेचे गमक होते. 'पिया तू अब तो आजा', 'ये मेरा दिल यार का दीवाना', 'इन आँखो की मस्ती के', 'याई रे याई रे जोर लगा के नाचो रे', 'ले गई ले गई', 'सांज ये गोकुळी' अशी कितीतरी गाणी त्यांनी आपल्या आवाजाने अजरामर केली. आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत झाला. वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून त्यांना गाण्याचा वारसा मिळाला. अवघ्या नवव्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले. त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आणि लता दीदींवर आली. १९४३ मध्ये 'माझा बाळ' या मराठी चित्रपटातील 'चला चला नव बाळा' हे त्यांचे पहिले गाणे. १९४८ मध्ये 'चुनरिया' चित्रपटातील 'सावन आया' या गाण्याने त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. सुरुवातीच्या काळात लता मंगेशकर, गीता दत्त, सुरैय्या यांनाच अधिकाधिक गाणी मिळायची. आशाताईंच्या वाट्याला 'बी' ग्रेड चित्रपटातील गाणी यायची. संगीतकार ओ. पी. नय्यर यांनी आशाताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखले. 'नया दौर'मधील 'माँग के साथ तुम्हारा' आणि 'उडे जब जब जुल्फें तेरी' या गाण्यांनी त्यांना अमाप लोकप्रियता मिळवून दिली. त्या काळात त्यांनी शास्त्रीय संगीत, कव्वाली आणि रोमँटिक गाण्यांमध्ये आपला ठसा उमटवला. ७०च्या दशकात आर. डी. बर्मन आणि आशा भोसले यांनी भारतीय संगीतात क्रांती घडवली. 'दम मारो दम'(हरे रामा हरे कृष्णा), 'पिया तू अब तो आजा'(कारवाँ) यासारख्या गाण्यांमुळे त्यांना 'पॉप क्वीन' ही नवी ओळख मिळाली. वयाच्या साठीनंतरही त्यांचा आवाज चिरतरुण राहिला. बाल वयापासून गायनाला सुरुवात करणा-या आशाताईंची सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी गिनीज बुकमध्ये नोंद आहे.त्यांच्या वेगळ्या आवाजाची भुरळ सा-या जगाला पडली होती. आशाताईंचं आयुष्य हे संघर्षमय आणि वादळी राहिलं. पण नावाप्रमाणेच त्यांनी कुठल्याही प्रसंगात आशा सोडली नाही. आशाताईंना एकूण नऊ फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. २००१ मध्ये जीवन गौरव, भारताचा सर्वोच्च कला सन्मान दादासाहेब फाळके पुरस्कार, देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान 'पद्मविभूषण' पुरस्काराने त्यांना नावाजले गेले. आशाताईंची खासियत म्हणजे ज्या ठसक्यात त्या लावणी गायच्या, त्याचप्रमाणे त्या जीव ओतून भावगीत देखील गायच्या. सुमारे ८०० चित्रपटांना आवाज देणा-या आशाताई दरवर्षी १५० ते १७० गाणी रेकॉर्ड करत. हीच त्यांची सातत्याची खरी ओळख होती. त्यांच्या हजारो गाण्यांनी केवळ संगीत नव्हे, तर भावनांचा इतिहास लिहिला. एकाच आवाजात प्रेम, वेदना आणि उत्साह व्यक्त होत असे. आजही आशाताईंचे गिनीज रेकॉर्ड अबाधित आहे, तो त्यांच्या अथक परिश्रमाचा जिवंत पुरावा आहे. त्यांचा आवाज आज थांबला असला तरी, आशा भोसले यांची गाणी आणि त्यांची परंपरा कायमच जिवंत राहील यात शंका नाही. आशा भोसले यांची मराठी चित्रपटांतील गाणी अत्यंत लोकप्रिय आहेत. 'गोमू संगतीनं', 'जांभूळ पिकल्या झाडाखाली', 'रूपेरी वाळूत', 'या रावजी बसा भाऊजी', 'मनमोहना तू राजा स्वप्नातला', 'मेंदीच्या पानावर', 'दिस जातील दिस येतील' यासारख्या सदाबहार गाण्यांचा समावेश आहे. त्यांच्या निधनानंतर राजकीय नेते, चित्रपटसृष्टीतील मान्यवर आणि सोशल मीडियावर श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. आशाताईंच्या निधनाने भारतीय संगीत विश्वातील एक युग संपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानातील रसिकांनीही आशाताईंना श्रद्धांजली अर्पण केली आहे. लता दीदी आणि आशाताईंनी निर्माण केलेला भारतीय संगीत विश्वाचा सुवर्ण अध्याय समाप्त झाला. पिढ्यान्पिढ्या मनात घर करणारा आवाज यापुढे ऐकू येणार नसला तरी त्यांची अजरामर गाणी जिवंत राहतील. त्यांची स्मृती जिवंत राहील. त्यांचे मंत्रमुग्ध स्वर अमर राहतील. सूरसम्राज्ञी आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली.






दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरू : मदत आणि उपचाराला मिळणार गती

मुंबई,दि.१३ : राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत.

महत्त्वाचे



## पि.एम.श्री स्व.अहेमदउल्ला खान नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक. शाळेत पालक सभा संपन्न

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पि.एम.श्री स्व.अहेमदउल्ला खान नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्रं. ३, रहेमत नगर, पुसद येथे दिनांक १०/०४/२०२५ शुक्रवार रोजी पालक सभा चा आयोजन करण्यात आला होता. कार्यक्रमाची शुरुवात कुरान शरीफ च्या तिलावता ने करण्यात आली. कार्यक्रमा च्या अध्यक्ष स्थानी शाळे ची जेष्ठ शिक्षिका सय्यदा शबाना होते व शाळे च्या मुख्याध्यापक अब्दुल हमीद मनियार यांनी शाळा व्यवस्थापण समिती च्या कार्य बदल संपूर्ण माहिती दिली. त्या पालक सभा मध्ये नवीन शाळा व्यवस्थापण समिती गठीथ करण्यात आली. सर्व पालका मधून चुनाव घेण्यात आला त्या मधून हि अध्यक्ष आणि उपाध्यक्षा ची निवड करण्यात आली. नवीन शाळा व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष म्हणून अब्दुल अजीज शेख महेबूब व उपाध्यक्ष अस्मा तबस्सुम हसन खान यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमा चे सूत्र संचालन मसरत शिरीन स. शिक्षका यांनी केले आणि आभार प्रदर्शन हुमेरा नाजनीन यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्या साठी अली बुशरा राणी, शिरीन खानम, अस्मा आफरीन इतर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दारू दुकाने बंद ठेवण्याची भीम आर्मी चीं मागणी

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**



पुसद : डॉं बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी शहरात विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच जयंती उत्सव शांततेत पार पडावा यासाठी दारू विक्रीची सर्व दुकाने एक दिवसासाठी बंद ठेवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे यासंदर्भात भिम आर्मी भारत एकता मिशन च्या वतीने उपविभागीय अधिकारी पुसद यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जयंती दिवशी मोठ्या प्रमाणावर मिरवणुका, अभिवादन कार्यक्रम आणि समाजप्रबोधन उपक्रम राबविले जातात. अशा वेळी दारू विक्री सुरू असल्यास अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने योग्य ती दखल घेऊन १४ एप्रिल रोजी सर्व वाईन शॉप, बीअर बार आदी दारू विक्री केंद्रे बंद ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी भीम आर्मी महाराष्ट्र प्रदेश संघटक अशोक भालेराव, आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत, आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हामहासचिव विशाल डाके, अजय लोखंडे, वैभव सूर्यवंशी, राहुल धूळे,उपस्तिथ होते

# महात्मा फुले यांच्या लढ्याच्या क्रांतीचे स्मरण करा!

## कोमल देवी (जे एन यु दिल्ली) यांचे प्रतिपादन

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



या धम्म मंचावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी समितीचा अत्यंत आभारी आहे.आज आपण फुले यांच्या जयंती निमित्त स्मरण करत आहोत, आपणास महात्मा फुले सोबत माता सावित्रीमाईंचे स्मरण करायचे आहे. आज फुले जयंती, निमित्य महात्मा फुले यांनी दिलेल्या अन्यायाच्या विरोधातल्या लढ्याच्या क्रांतीचे स्मरण करायचे आहे. हा दिवस त्या क्रांतीचे स्मरण करण्याचा प्रसंग आहे, जेव्हा समाजात विषमता, अन्याय, जातीयवाद इत्यादी प्रचलित होते आणि महात्मा फुले त्याविरुद्ध लढत होते, म्हणूनच या दिवशी आपण आपल्या महान पुरुषाचे स्मरण करतो.

महात्मा फुले यांनी शिक्षणाबद्दल सांगितले होते, या मोहिमेमागे काय कारण आहे, आपला समाज मागे पडत आहे, शिक्षणाच्या नावाखाली अज्ञान मर्यादित ठेवणे हे जातीय वादासारखे आहे, ज्यासाठी त्यांनी लिहिले की फक्त ब्राह्मणच शिकू शकतात, दलितांना मागासवर्गीयांना शिक्षणाचा हक्क का नाही.! म्हणून आम्ही म्हणतो की ज्ञानावर एकचा अधिकार कसा काय?असू शकतो, हे महान पुरुष ही साखळी चालवत आहेत आणि तरीही आज ही अन्याय होत आहे असे म्हटले जात आहे. त्यामुळेच ते उघडपणे लढत होते, वैज्ञानिक ज्ञानावर कोणाचीही मक्तेदारी असू शकत नाही, अज्ञानामुळे बहुजन समाज मागे पडला होता, महात्मा फुले यांना समानता हवी होती, त्यांनी आजच्या विकृत किंवा उच्च व्यवस्थेविरुद्ध लढा दिला आणि तसेच भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा पाठिंबा होता, म्हणूनच त्या दोघांनी असमानता आणि अन्यायाविरुद्ध आपली चळवळ सुरू केली, त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांचे स्मरण करतो, आपण त्या क्रांति कारकांना जय भीम म्हणतो. आणि हक्कांपासून ते अस्मितेपर्यंत, या विषयावर मला माझा प्रकाश टाकायचा आहे; भारतीय संविधानाने आपल्याला दिलेल्या हक्कांविषयी, ज्यासाठी आपण आज बोलू शकतो, लढू शकतो आणि सर्व काही करू शकतो. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण क्रांतिकारक महात्मा फुले यांना वंदन करतो आणि त्यांचे स्मरण केले पाहिजे असे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन कोमल देवी धम्मक्रांती प्रज्ञा पर्व पुष्पगुंपताना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरतीताई फुफाटे,अर्चना भुरके, शिल्पा देशमुख, अर्चना जगताप, मीनाक्षी गोटे, वंदना गायकवाड, संगीता डोंगरे, दिपालीताई जाधव,छाया हंबर्डे,अश्विनी पुनवटकर,सीमा तायडे, वर्षाताई भवरे, प्रज्ञा जाधव, प्रियंका खाडे यांच्या सह धम्मक्रांती प्रज्ञापर्व अध्यक्ष प्रा. सुनील खाडे यांची उपस्थिती होती. संबोधी महिला मंडळ व पंचशील महिला मंडळ यांनी सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संचालन रंजना ओहे यांनी केले , तर आभार पद्मा दिवेकर यांनी मानले. या कार्यक्रमाला पुसद तालुक्यातील बहुसंख्य धम्मबांधव महिला, युवक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## यवतमाळमध्ये ३.६० लाखांचे प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाणे जप्त; २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ, दि.१३ : जिल्ह्यात अवैध बियाणे विक्री आणि वाहतुकीविरोधात कृषी विभाग व पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या अनधिकृत एचटीबीटी (प्लॅटिनम 5G) कापूस बियाण्यांची चोरटी वाहतूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत प्रशासनाने सुमारे २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१२ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ शहरात एका 'किया सोनेट' (GJ-09-5486) आणि अन्य एका चारचाकी वाहनातून प्रतिबंधित बियाण्यांची तस्करी होणार असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे कृषी विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरीत्या सापळा रचून ही वाहने अडवली.

झडती दरम्यान पथकाला मोठ्या प्रमाणात अवैध साठा मिळून आला. यामध्ये 'प्लॅटिनम 5G' नावाच्या प्रतिबंधित कापूस बियाण्यांची ४०० पाकिटे (एकूण ८ पोते), जप्त केलेल्या बियाण्यांची बाजारभावानुसार किंमत ३.६० लाख रुपये आहे. २ चारचाकी वाहने आणि ३ मोबाईल फोन (किंमत १६.४० लाख रुपये), एकूण २० लाख ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) प्रेमनाथ आडे यांच्या फिर्यादीवरून यवतमाळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेत असलेल्या आरोपींमध्ये संतोष ठाकरे (रा. चांदूर रेल्वे, जि. अमरावती), निखिल लंगडे (रा. आर्वी, जि. वर्धा), सतीश ठाकरे (रा. अमरावती) ही नावे आहेत.

आरोपींविरुद्ध बियाणे कायदा १९६६, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या विविध कलमान्वये गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही कारवाई निविष्ठा व गुणनियंत्रक संचालक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे आणि कृषी विकास अधिकारी लहुदास आडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धीरज मोहेकर, प्रवीण जाधव व सहकाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली. > शेतकऱ्यांनी अनधिकृत आणि प्रतिबंधित बियाण्यांची खरेदी करू नये, कारण यामुळे जमिनीचे आणि पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ शकते. अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## महिलेचा विनयभंग प्रकरणी सहा महिन्याचा कारावास

**विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी :-विरेंद्र चव्हाण**



कळंब : तालुक्यातील सावरगाव येथील आरोपी रितेश नानाजी वासे (३३) याने ४ जानेवारी २०१८ रोजी केलेल्या महिलेच्या विनयभंगाच्या गुन्ह्यात कळंब न्यायालयाचे न्यायाधीश मा.ह. ना. पोले, प्रथम न्याय दंडाधिकारी यांनी १० एप्रिल २० २६ रोजी सदर गुन्ह्याचा निकाल देत आरोपीला ६ महिने सश्रम कारावास व ५००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. तालुक्यातील सावरगाव येथील आरोपी रितेश नानाजी वासे (३३) याने महिलेचा विनयभंग केल्याची कळंब पोलीस स्टेशनला तक्रार प्राप्त झाल्याने पोकॉ. गणेश महादेव अनकर यांनी गुन्ह्याचा तपास करुन कलम ३५४ अ (१) (२) भा. द. वि. च्या गुन्ह्यात ४ जानेवारी २०१८ च्या दाखल गुन्ह्यांमध्ये

मा. प्रथम न्यायदंडाधिकारी कोर्ट कळंब यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्या गुन्ह्याचा १० एप्रिल २०२६ रोजी मा.ह. ना. पोले प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी कोर्ट कळंब यांनी सदर गुन्ह्याचा निकाल दिला असून आरोपी नामे रितेश नानाजी वासे (३३) रा. सावरगाव यास कलम ३५४ अ (१) मध्ये ६ महिने सश्रम कारावासाची व ५००० रुपये दंड शिक्षा ठोठावली आहे. तसेच ३५४ आ (१) (२) मध्ये ६ महिने सश्रम कारावास व ५००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकारी अभियोक्ता आर. आर. त्रिवेदी यांनी सरकारी पक्षातर्फे खटल्याचे काम पाहिले. तसेच ठाणेदार आर. के. राठोड यांचे मार्गदर्शनात तसेच कोर्ट मोहर पो. ना. मनोज डुमरे यांनी साक्षीदार यांना मार्गदर्शन केले.

## शिवराय, फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हीच लोककल्याणाची खरी वाटचाल!

### अक्षयदादा राऊत यांचे प्रबोधन; हजारो श्रोते मंत्रमुग्ध

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या संयुक्त जयंती महोत्सवाचे औचित्य साधून, रमाई धम्म प्रतिष्ठानच्या वतीने १२ एप्रिल रोजी एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोककल्याणकारी विचार' या विषयावर महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते अक्षयदादा राऊत यांनी आपल्या अमोघ वाणीने हजारो श्रोत्यांना तीन तास खिळवून ठेवले. विचारांची त्रिसूत्री: समता, बंधुता आणि न्याय* आपल्या व्याख्यानात अक्षयदादा राऊत यांनी ऐतिहासिक संदर्भासह महापुरुषांच्या कार्याचा पट उलगडला. ते म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ सत्तांतर नव्हती, तर ती रयतेच्या कल्याणाची चळवळ होती. तोच वारसा पुढे महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून पुढे नेला." राऊत यांनी विविध उदाहरणे देत स्पष्ट केले की, शिवरायांच्या कालखंडातील लोककल्याणकारी धोरणे, फुलेंचा सत्यशोधकी विचार आणि आंबेडकरांचे समतेचे तत्त्वज्ञान हे एकमेकांना पूरक कसे आहेत, हे शास्त्रीय पुराव्यानिशी मांडले. अध्यक्षीय भाषणातून समतेचा संदेश* कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख दिलीप सरदार होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महापुरुषांचे विचार हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी, समतेसाठी आणि बंधुत्वासाठी कसे आवश्यक आहेत, हे अधोरेखित केले. मान्यवरांची उपस्थिती आणि नियोजन* कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करून झाली.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय अभिनव पाचडे यांनी अतिशय समर्पक शब्दात कार्यक्रमाची भूमिका मांडली. सूत्रसंचालन प्रा. एल. डी. सरोदे यांनी आपल्या शैलीदार भाषणाने कार्यक्रमात रंगत आणली. आभार निलेश शिंगाडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले. प्रतीक नगरात जनसागराची उपस्थिती या व्याख्यानासाठी प्रतीक नगर आणि परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विशेष म्हणजे, व्याख्यान सुरू असताना तीन तास हजारो श्रोते स्तब्ध होऊन महापुरुषांच्या विचारांचे अमृतपान करत होते.या कार्यक्रमास सहकार्य चेतन इंगळे, राजेश पाटील,अमित शेजव,राजेंद्र गवई, अभिमन्यू पाचडे,रोशन इंगळे,लकी थाटे, विपूल उमाळे,गणूदास रौंदळे, पिंटू इंगळे,सचिन इंगोले, प्रथमेश पाचडे, दिनेश नाईक,अमरदीप तायडे,भुषण सरदार, गौरव पोफळे,आकाश वसू,पवन देशमुख पवन पवार यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम संपन्न झाला, रमाई धम्म प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग, नगरपरिषद यवतमाळ यांच्या वतीने दि. १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अग्निशमन सेवेत कार्य करताना प्राणाची आहुती देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा सप्ताह दरवर्षी केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा केला जातो.

गृह मंत्रालयाने दिलेले घोषवाक्य "सुरक्षित शाळा सुरक्षित रुग्णालय आणि अग्नी सुरक्षिततेसाठी जागरूक समाज आग प्रतिबंधकतेसाठी एकत्रपणे" या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राष्ट्रीय अग्निशमन दिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन विषयक माहितीपर कार्यक्रम व प्रात्यक्षिके आयोजित केली जाणार आहेत.

## लोही विद्युत विभागाचा भोंगळ कारभार

### डीपीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**विदर्भ केसरी। दारव्हा**



लोही परिसरातील विद्युत वितरण विभागाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. खराब अवस्थेतील डीपी (ट्रान्सफॉर्मर) आणि त्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे शेती पंपांना वारंवार अडथळे निर्माण होत असून उन्हाळी हंगामात पिकांचे नुकसान होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार संबंधित डीपीवर कोणताही जादा लोड नसतानाही त्यातून तेल गळत असून धूर व मोठा आवाज येत आहे. त्यामुळे ट्रान्सफॉर्मरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही विद्युत विभागाकडून योग्य ती दखल घेतली जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

माहितीनुसार, संबंधित डीपीमुळे समस्या निर्माण होत असल्याने काही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन दुसऱ्या डीपीवर हलविण्यात आले. मात्र तेथेही तीच समस्या निर्माण झाल्याने कायमस्वरूपी दुरुस्ती न करता तात्पुरती उपाययोजना केल्या जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत. याशिवाय संबंधित विभागातील काही अधिकाऱ्यांवरही शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. अभियंते आणि कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याचा तसेच तक्रारींवर योग्य प्रतिसाद देत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे शेतकऱ्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत असल्याचेही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांनी सांगितले की, दि. ४ रोजी यासंदर्भात लेखी तक्रार देण्यात आली होती. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिणामी उन्हाळी हंगामातील शेतीसाठी आवश्यक असलेले पाणीपुरवठा विस्कळीत होत असून पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, लोही विद्युत विभागाकडून केवळ थकीत वीजबिल वसुलीवरच भर दिला जात असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.

शेतीसाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्याच्या समस्यांकडे मात्र दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन डीपीची तपासणी करावी, कायमस्वरूपी दुरुस्ती करावी आणि दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.


## नगरपंचायत कार्यालय ढाणकी ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ

न.प. फोन न. :- 07231 241022 Email ID :- dhankinp@gmail.com

जा.क्र./बांध.वि./का.अ./ 218 /2026-2027 दिनांक :- 10 /04/2026

### ई निविदा सूचना क्र. 05

ढाणकी नगरपंचायतला विविध योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून व नगरपंचायत निधीमधून करावयाचे विविध विकास कामाचे नकाशे व अंदाजपत्रक तथा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) करणेसाठी अनुभवी अशा वस्तूविशारद/अभियंता/ अधिकृत तांत्रिक सेवा संस्था व प्रकल्प सल्लागारांचे पॅनल तयार करावयाचे आहे .

| अ.क्र. | कामाचे नाव | कोरे निविदा किंमत | अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2026-27 करीता नगरपंचायत ढाणकीसाठी विविध योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून व नगरपंचायत निधीमधून करावयाचे कामाचे नकाशे व अंदाजपत्रक तथा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता सल्लागार नियुक्त करणे. (सल्लागार अंतर्गत करावयाची कामे जसे नकाशे, अंदाजपत्रके, आराखडा तयार करून त्यास तांत्रीक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त करणे,आवश्यकतेनुसार आर.सी.सी. डिझाईन तयार करणे तसेच त्यास तत्सम विभागाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे इत्यादी कामाचे दर पुरविणे. | रु. 1000 /- | रु. 5000 /- | सन 2026-27 आर्थिक वर्ष |

### ई-निविदा प्रसिद्धीचा तपशील

| | |
|---|---|
| ऑनलाईन ई-निविदा प्रसिद्धी ,विक्री सुरुवात दिनांक व वेळ | दिनांक 15/04/2026 वेळ सकाळी 11.00 वाजता |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दिनांक 22/04/2026 वेळ सायंकाळी 05.00 वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र.1 (Technical Bid) उघडण्याची वेळ व स्थळ | दिनांक 23/04/2026 वेळ दुपारी 01.00 वाजता |

अटी व शर्ती :

निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदेची पुढील सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाचे http.//mahatenders.gov.in या वेबसाईटवर सविस्तर पहावयास मिळेल .

- स्वा -
(अजय कुरवाडे)
मुख्याधिकारी
नगरपंचायत ढाणकी

## वाघापूर टेकडी परिसरात युवकाला मारहाण

यवतमाळ : जुना वाद उकरुन काढत एका ३० वर्षीय युवकाला बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना शहरातील वाघापूर टेकडी परिसरातील पंचशील नगरात १२ एप्रिल रोजी घडली. आकाश प्रकाश डोंगरे असे मारहाण झालेल्या युवकाचे नाव आहे. तो खंडारे यांच्या दुकानासमोर उभा असताना तेथे सिद्धार्थ हरीलाल सरोज हा युवक आला आणि 'साइडला चल तुझ्यासोबत बोलायचे आहे' असे म्हणत तो आकाशला घेवून गेला. त्यानंतर जुने भांडण उकरुन काढत त्याने आकाशला लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरु केली. खिशातून हत्यारसदृश वस्तू काढून त्याने आकाशच्या कानावर मारली़ यात आकाशचा उजवा कान तुटला़ यात गंभीर जखमी झालेल्या आकाश प्रकाश डोंगरे (३०) रा. पंचशीलनगर यवतमाळ याने लोहारा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### महत्त्वाचे

## अध्यक्षपदी विनोद लढ्ढा, तर सचिवपदी श्याम पल्लोड यांची निवड*

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी -प्रदिप खंडारे**

येथील माहेश्वरी भवन येथे रिसोड तहसील माहेश्वरी संघटनेची नूतन कार्यकारिणी निवडण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साही आणि गरिमामय वातावरणात पार पडलेल्या या सभेत संघटनेची आगामी काळासाठीची कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. समाजाची एकजुटता आणि विश्वासाचे दर्शन घडवत पार पडलेली ही निवड प्रक्रिया समाजबांधवांसाठी अभिमानास्पद ठरली आहे. या निवडणूक प्रक्रियेसाठी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. पवन भंसाली यांनी काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन कार्यकारिणीची विधिवत घोषणा करण्यात आली. या प्रसंगी निवडणूक उपअधिकारी कृष्णा पल्लोड सर आणि निवडणूक पर्यवेक्षक तथा जिल्हा उपाध्यक्ष डॉ.राजकुमार मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. नवनियुक्त पदाधिकारी मध्ये तहसील माहेश्वरी संघटना अध्यक्ष विनोद लढ्ढा तर सचिव श्याम पल्लोड यांची निवड करण्यात आली तर महिला संघटना कार्यकारिणी अध्यक्ष सौ.सुरेखा पुरुषोत्तम तोष्णीवाल यांची तर सचिव पदी सौ. रूपा धूत यांची निवड करण्यात आली. रिसोड तालुक्यातील बहुसंख्य समाजबांधवांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली. नवनियुक्त पदाधिकारी आपल्या कार्यकाळात सेवा, सदाचार आणि संघटन ही त्रिसूत्री राबवून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी कटिबद्ध राहतील, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. या निवडीबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून आणि समाजबांधवांकडून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



## चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी समाधान शिबिर -आमदार प्रवीण तायडे

**▸विदर्भ केसरी। शिरजगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:-**

गोरगरिबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी समाधान शिबिर असल्याचे आमदार प्रवीण तायडे म्हणाले. ते छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा आणि करजगाव या दोन राजस्व मंडळचे शि.कसबा येथील बालमुकुंद राठी विद्यालयातील शिबिरात अध्यक्षीय भाषणात बोलत होते.यावेळी मंचावर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,तहसीलदार सोनल सूर्यवंशी,माजी जि.प.सभापती मनोहर सुने,संजय थेलकर, साहेबराव अस्वार,बाळासाहेब सोनार, धीरज जवंजाळ तथा भाजप पदाधिकारी व प्राचार्य श्री.सुरडकर ,शाळेचे उपाध्यक्ष, श्यामसंदर राठी उपस्थित होते. समाधान शिबीर मध्ये सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्याकडून ग्रामस्थांचे कामे व तक्रारीचा निपटारा एकाच ठिकाणी करण्यात आला. शिबीरमध्ये महसूल विभाग कडून मौजा देऊरवाडा व काजळी येथील एकूण २७ पुरुष शेतकरी यांनी आपल्या पत्नीचे नाव ७/१२ मध्ये लक्ष्मी मुक्ती योजने अंतर्गत सहधारक म्हणून लावण्यास संमती दिल्याने त्यांचे अभिनंदन करून सर्व महिलांना ७/१२ चे वाटप करण्यात आले,या ठिकाणी उपस्थित महिलांनी " '७/१२ वरील माझा हक लक्ष्मी मुक्ती* *योजनेमुळे शक्य" असे घोषवाक्य केले. तुकडेबंदी कायदा शासनाने शिथिल करून निवासी प्रयोजनार्थ १ गुंठा खरेदी असलेल्या लाभार्थी यांचे नावे फेरफार घेऊन ७/१२ वाटप करण्यात आले तसेच इतर अधिकार मधील तगाई कर्जाचे अनावश्यक नोंदी फेरफार घेऊन कमी करून ७/१२ वाटप करण्यात आले, ई राशन कार्ड वाटप तसेच संजय गांधी, श्रावण बाळ लाभार्थी यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.इतर विभागाकडून ही शासनाचे विविध योजने अंतर्गत लाभ लाभार्थी यांना देण्यात आले.कार्यक्रम चे संचालन मंडळ अधिकारी परवेज पठाण यांनी केले.सदर शिबीर मध्ये महसूल विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, महिला व बाल्कल्याण विभाग, भूमी अभिलेख, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण विभाग, वन विभाग,परिवहन विभाग, दुयम निबंधक विभाग, सेतू केंद्र वरील सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच शिरजगांव कसबा व करजगांव महसूल मंडळ मधील मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी सर्व महसूल सेवक,ग्रामस्थ उपस्थित होते.

# उन्हाळ्यात वाढता दुग्धजन्य पदार्थांचा खप... पण भेसळीचा धोका ?

## जिल्ह्यात आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी स्थिती

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




उन्हाळ्याची चाहूल लागली की बा जारपेठेत थंड पेयांसह दुग्धजन्य प दार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढ ते . लस्सी, कुल्फी, बदाम शेक, थंड दूध, दही, पनीर, खवा यांसारख्या पदार्थांचा खप अचानक वाढताना दिसतो. मात्र या वाढत्या मागणीसोबतच एक गंभीर प्रश्नही समोर येतो—पुरवठा होणारे हे पदार्थ शुद्ध आहेत का?

उ न्हाळ्यात ग्राहकांची मागणी पू र्ण करण्यासाठी काही विक्रेते व उ त्पा दकांकडून भेसळीचा मार्ग अवलंबला जात असल्याची चर्चा रंगू लागली आहे. दुधात पाणी मिसळणे, दही घट्ट दिसावे म्हणून रसायनांचा वापर, पनीर व खवा बनवताना निकृष्ट दर्जाच्या पदार्थांचा वापर, तसेच कृत्रिम स्वाद व रंग यांचा वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या गाड्यांवर विकली जाणारी लस्सी, कुल्फी किंवा शेक यांची तपासणी नियमितपणे होत नसल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी स्वच्छतेचा अभावही जाणवतो. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांमुळे पोटाचे विकार, अन्न विषबाधा, उलट्या, जुलाब यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांसाठी तर हा धोका अधिक गंभीर ठरू शकतो.

- **दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाने (FDA) उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तपासण्या वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे. मात्र प्रत्यक्षात कारवाई कितपत होते, याबाबत नागरिकांमध्ये शंका आहे.**

### ग्राहकांनी काय करावे?

- **उघड्यावर विकले जाणारे पदार्थ शक्यतो टाळावेत विश्वासार्ह दुकानदारांकडूनच खरेदी करावी चव, वास किंवा रंग संशयास्पद वाटल्यास वापर टाळावा तक्रार असल्यास तत्काळ प्रशासनाकडे कळवावे उन्हाळ्यात गारवा देणारे हे पदार्थ आरोग्यासाठी धोकादायक ठरू नयेत, यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा "थंडावा" देणारे पदार्थच नागरिकांच्या तब्येतीला "गरम" करू शकतात, अशी उपरोधिक चर्चा सध्या रंगू लागली आहे.**

# गोंडपिपरी नगरपंचायतीत सीओंचा 'मनमानी' कारभार

## १५ नगरसेवकांच्या निवेदनाला दाखवली केराची टोपली!



**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

स्थानिक नगरपंचायतीमध्ये लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील वाद आता विकोपाला गेला आहे. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे नगरसेवकांच्या अधिकारांना डावलून 'मनमानी' पद्धतीने कारभार करत असल्याचा गंभीर आरोप शहरातील तब्बल १५ नगरसेवकांनी केला आहे. सर्व नगरसेवकांनी एकत्र येऊन दिलेल्या निवेदनाला मुख्याधिकाऱ्यांनी चक्क 'केराची टोपली' दाखवल्याने शहराच्या विकासकामांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोंडपिपरी नगरपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या लिपिकांच्या बदल्यांबाबत नगराध्यक्षांसह १५ नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले होते. चुकीच्या पद्धतीने झालेल्या बदल्यांमुळे कामकाजात अडथळा येत असून नागरिकांची कामे रखडत असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले होते. मात्र, मुख्याधिकाऱ्यांनी या निवेदनाची दखल न घेता स्वतःच्याच निर्णयावर ठाम राहून लोकप्रतिनिधींच्या मागणीला केराची टोपली दाखवली आहे. नगरपंचायतीमध्ये सत्ताधारी आणि विरोधी अशा सर्वच गटाचे नगरसेवक या विषयावर एकवटले आहेत.

- **नगरसेवकांचे म्हणणे आहे की, "जर मुख्याधिकारी १५ नगरसेवकांच्या सामूहिक मागणीचा सन्मान करत नसतील, तर शहराचा विकास कसा होणार?" मुख्याधिकाऱ्यांच्या या आडमुठ्या धोरणामुळे विकासकामांच्या फाईल्स अडकून पडल्या असून, साध्या कामांसाठीही नागरिकांना नगरपंचायतीचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.**

मुख्याधिकारी कोणत्याही कामात नगरसेवकांना विश्वासात न घे ता आपल्याच पद्धतीने निर्णय घेत असल्यामुळे सर्व सदस्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. "प्रशासन हे जनतेच्या सो यीसाठी असते, मात्र येथे प्रशासन लो क प्रतिनिधींनाच जुमानत नाहीये," अशी संतप्त प्रतिक्रिया एका नगरसेवकाने व्यक्त केली.

या गंभीर विषयावर वरिष्ठ स्तरावरून लक्ष देऊन मुख्याधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला लगाम घालण्यात यावा, अन्यथा आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवकांनी दिला आहे. आता या वादावर जिल्हा प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण गोंडपिपरी शहराचे लक्ष लागले आहे .







दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
!! पाहिजेत !!
**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.
पात्रता आणि आवश्यकता:
पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.
- शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
- आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
- एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.
इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९



चंद्रपूर TODAY GOOD MORNING
BREAKING NEWS
दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मंगळवार, दि. 14 एप्रिल 2026

» Selected

### कोरची येथे EMRS मुलींसाठी क्रिकेट प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन



देसाईगंज - दि. १२ एप्रिल २०२६ रोजी, एकलव्य मॉडेल रेसिडेंटल स्कूल (EKLAVYA MODEL RESIDENTIAL SCHOOL), कोरची जि. गडचिरोली येथे आदिवासी विद्यार्थिनींसाठी आयोजित “EMRS गर्ल्स क्रिकेट कोचिंग कॅम्प” चे उद्घाटन आमदार रामदास मसराम यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी आमदार रामदासजी मसराम यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी मुलींनी क्रीडा क्षेत्रात पुढे येत आपले कौशल्य विकसित करावे, तसेच अशा शिबिरांचा लाभ घेऊन राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडावी, असे आवाहन केले. या शिबिरात क्रिकेटचे मूलभूत तंत्र, फिटनेस, संघभावना व शिस्त यांचे प्रशिक्षण दिले जात असून “EMPOWERING TALENT, BUILDING CONFIDENCE, INSPIRING DREAMS” या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

---

### शिकारीटोला येथे आ. रामदास मसराम यांची भेट



शिकारीटोला : कोरची दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी शिकारीटोला येथे आमदार श्री रामदासजी मसराम यांनी भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ग्रामस्थांनी पाणी, रस्ते व इतर मूलभूत सुविधांबाबतच्या विविध समस्या मांडल्या. आमदार मसराम यांनी त्या समस्यांची दखल घेत संबंधित विभागाशी समन्वय साधून लवकरात लवकर निराकरण करण्याचे आश्वासन दिले. त्या प्रसंगी सोबत काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष कोरची मनोज अग्रवाल, माजी जिल्हा परिषद सदस्य रामसुराम काटेंगे, काँग्रेस कमिटी जिल्हा उपाध्यक्ष सदरूभाई भामानी उपस्थित होते.

---

### देसाईगंज ग्रामीण रुग्णालयास आ. रामदास मसराम यांची भेट



देसाईगंज - दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी वडसा येथील ग्रामीण रुग्णालयास आमदार श्री रामदासजी मसराम यांनी भेट देऊन भरती रुग्णांची पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णांची विचारपूस करून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली तसेच उपचारांबाबत माहिती जाणून घेतली. दरम्यान चिखली रिठ येथील पुरुषोत्तम पंढरी धोटे यांच्यावर वाघाने हल्ला केल्याची घटना घडली असून ते सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. आमदार मसराम यांनी त्यांच्या प्रकृतीची विशेष विचारपूस करून डॉक्टरांकडून उपचारांची माहिती घेतली व योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या. तसेच डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधत रुग्णांना वेळेवर व दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी आवश्यक त्या सूचना त्यांनी दिल्या. रुग्णालयातील सुविधा, स्वच्छता व औषधसाठ्याचीही त्यांनी पाहणी केली. यावेळी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी विविध अडचणी मांडल्या असून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आमदार मसराम यांनी दिले.

# नारी शक्तीतून राष्ट्रशक्तीची भव्य निर्मिती

## माजी आमदार कृष्णा गजबे यांचे प्रतिपादन

**विदर्भ केसरी । देसाईगंज**






देसाईगंज (शहर) येथे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या देसाईगंज (शहर) मंडलातर्फे वन कर्मचारी पतसंस्था सभागृहात १० आणि ११ एप्रिल रोजी आयोजित दोनदिवसीय निवासी कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. या शिबिरात सात सत्रांद्वारे कार्यकर्त्यांना भाजपचा इतिहास, संघटना विस्तार, वैचारिक अधिष्ठान, सरकारची कामगिरी, बुथ व्यवस्थापन आणि सोशल मीडिया यांचे मार्गदर्शन करण्यात आले.

दिवसभराच्या सत्रांमध्ये प्रथम भाजपचा इतिहास आणि विकासावर जिल्हा कायमनिमंत्रित सदस्य रामभाऊ पडोळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पक्षाच्या संघर्षमय प्रवासावर प्रकाश टाकून कार्यकर्त्यांना एकजुटीने पुढील ध्येय साध्य करण्याचे आवाहन केले. दुसऱ्या सत्रात एस.आय.आर. (SIR) विषयावर भाजपा जिल्हा महामंत्री सदानंद कुथे यांनी विशेष तंत्रे शिकवली, ज्यामुळे कार्यकर्ते मतदार नोंदणी आणि पुनरावलोकनाबाबत सजग झाले.

तिसऱ्या सत्रात संघटन विस्ताराची दृष्टी माजी जिल्हाध्यक्ष किसनजी नागदिवे यांनी मांडली. चौथ्या सत्रात वैचारिक अधिष्ठानावर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मोतीलाल कुकरेजा यांनी पंडित दीनदयालांच्या एकात्म मानववाद तत्त्वज्ञानावर भाष्य केले, जे कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरले.

पाचव्या सत्रात ‘आपल्या सरकारची कामगिरी’ या विषयावर आरमोरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार कृष्णाजी गजबे यांनी प्रभावी भाषण केले. त्यांनी महिलांसाठी आत्मसन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणावर भर देऊन सांगितले, “नारी शक्तीतून राष्ट्र शक्तीची निर्मिती होते. पंतप्रधान उज्वला योजनेने १०.५१ कोटी पेक्षा अधिक एलपीजी कनेक्शन वाटप करून महिलांना स्वयंपाकाच्या धुरापासून मुक्त केले. स्टार्टअप इंडियाने १.९७ लाख स्टार्टअप्स नोंदवली, ज्यात १०० युनिकॉर्न आहेत; यामुळे रोजगार वाढला.” गजबे यांनी पुढे सांगितले, “राष्ट्रीय पाठ्यवृत्ती अंतर्गत ४२ लाख शिकाऊंना ट्रेनिंग, मुद्रा योजनेने विना हमी कर्ज देऊन स्वयंरोजगाराला चालना. आरोग्यात मिशन इंद्रधनुषने ५.५ कोटी बालके आणि १.३ कोटी गर्भवती महिलांचे लसीकरण, कोविडमध्ये २२० कोटी डोस. AIIMS ७ वरून २२ झाले, वैद्यकीय महाविद्यालये ३८५ वरून ८०८. जनऔषधी केंद्रे १७९९० ने गरीबांना दिलासा. ई-श्रमने ३१ कोटी कामगारांची नोंदणी करून असंघटित क्षेत्राला आधार दिला.” हे सत्र कार्यकर्त्यांमध्ये उत्साहपूर्ण ठरले. सहाव्या सत्रात बुथ व्यवस्थापनावर नगरसेवक भारत बावनथडे यांनी व्यावहारिक मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात सोशल मीडिया आणि ए आय नमो या सरल अँप वर नरेश भाऊ विठ्ठलानी यांनी डिजिटल प्रचाराचे तंत्र शिकवले. गडचिरोली पोलीस भरतीत निवड झालेल्या उमेदवारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या दोन दिवसीय शिबिराला उपस्थित माजी आमदार कृष्णा गजबे, माजी जिल्हाध्यक्ष किसनजी नागदिवे, जिल्हा महामंत्री सदानंद कुथे, भाजपाचे ज्येष्ठ नेते रामभाऊ पडोळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मोतीलाल कुकरेजा, राजूभाऊ जेटानी, सचिन भाऊ वानखेडे, नगराध्यक्षा लताताई सौंदरकर, नगर उपाध्यक्ष नरेश विठ्ठलानी उपस्थित होते. शहराध्यक्ष सचिन खटकाटे यांचे प्रास्ताविक, विलास ढोरे यांचे सूत्रसंचालन आणि सचिन वानखेडे यांनी आभार मानले. समारोप राष्ट्रगीताने झाला.

# सहाय्यक उपअधीक्षक संगीता पाटील यांचा मनमानी कारभार...!

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**




गडचिरोली :- तालुक्यातील उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय गडचिरोली येथे दिनांक ०९ एप्रिल पासुन वसा गावातील बंदोबस्त नकाशा व पुनर्मोजणी नकाशा करीता अर्ज सादर केलेला असून, सदर अर्जाच्या नकाशाच्या प्रती घेन्याकरीता दिनांक १३ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता पासुन कार्यालयात गेल्यानंतर नकाशा तयार व्हायला वेळ असल्यामुळे ४:३० वाजेपर्यंत वाट बघत राहुन नकाशाच्या प्रती मिळाल्यानंतर रीतसर चालान पावती भरुनही संगिता पाटील (उप अधीक्षक) यांनी सदर नकाशा फाईलवर सही करण्यास मना करत एक तासानंतर या म्हणून नाहक त्रास दिल्यामुळे, असे निदर्शनास येते की सदर भुमी अभिलेख कार्यालयात अशाप्रकारेच बहुतांश शेतकऱ्यांना सुद्धा दिवसेंदीवस आपल्या शेतीच्या कामासाठी येनाऱ्या शेतकऱ्यांना अशा मनमानी अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागुन, एकाच कामासाठी रोज-रोज विनाकारणच चकरा माराव्या लागतात. त्यामुळे अशा कर्मचारी व अधिकारी यांच्यावर प्रशासकीय वरीष्ठ अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, की काय असे प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात घर करून बसले आहे.

# नारी शक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ शहरात 15 एप्रिल ला भव्य पदयात्रा रॅलीचे आयोजन

## भाजप महिला आघाडी जिल्हा गडचिरोलीच्या वतिने आयोजन

**विदर्भ केसरी । गडचिरोली**


भारतीय जनता पार्टी महिला आघाडी, जिल्हा गडचिरोलीच्या वतीने महिलांच्या सक्षमीकरणासाठी भव्य पदयात्रा रॅलीचे दि.१५ एप्रिल रोजी दुपारी 03:00 वाजता मा.आमदार डॉ. मिलिंदजी नरोटे यांच्या जनसंपर्क कार्यालयात एकत्रित होवुन शहरातील मुख्य बाजारपेठ मार्गाने पदयात्रा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या नारी शक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ ही रॅली आयोजित करण्यात येत आहे. या भव्य पदयात्रेचे नेतृत्व मा.माजी खासदार डॉ.अशोकजी नेते, मा.आमदार डॉ.मिलिंद नरोटे, माजी आमदार डॉ. देवरावजी होळी, जिल्हाध्यक्ष प्रा. रमेशजी बारसागडे, मा.आमदार क्रिष्णाभाऊ गजभे, प्रणोती निबोंळकर नगराध्यक्ष न.प.गडचिरोली, ओबिसी नेते बाबुरावजी कोहळे माजी जिल्हाध्यक्ष, माजी जिल्हाध्यक्ष किसनजी नागदेवे, माजी. जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, रमेश भुरसे प्रदेश सचिव किसान मोर्चा, रेखाताई डोळस प्रदेश सचिव महीला मोर्चा, जिल्हा महामंत्री प्रकाशजी गेडाम, जिल्हा महामंत्री गोविंदजी सारडा, जिल्हा महामंत्री सदानंद कुथे, भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष योगिताताई पिपरे यांच्या प्रमुख नेतृत्वात करण्यात येणार आहे. रॅलीद्वारे महिलांच्या सन्मान, सक्षमीकरण आणि राजकीय सहभागाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

भाजपा महिला आघाडीच्या व जिल्ह्यातील सर्व आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, तालुका महिला आघाडीं व सर्व आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, शहरातील भाजपा पदाधिकारी व. कार्यकर्ते जिल्यातिल सर्व नगरपरिषद, नगरपंचायत मधिल अध्यक्ष, नगरसेविका, नगरसेवक व ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच व सदस्य, मोठ्या संख्येने महीला व नागरिक रॅलीमध्ये सहभागी होऊन या ऐतिहासिक विधेयकाला समर्थन द्यावे.

# मुलानेच केला वडिलांचा कुऱ्हाडीने निर्घृण खून..!

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

कौटुंबिक वादाचे भीषण रूप समोर आले असून, एका तरुणाने स्वतःच्या वडिलांचा कुऱ्हाडीने वार करून खून केल्याची धक्कादायक घटना आरमोरी तालुक्यात घडली आहे. रविवारी (दि. १२) सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास आरमोरी-पालोरा मार्गावर ही घटना घडली असून, यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. देवाजी आडकू धकाते (वय ६५, रा. ताडूरवारनगर, आरमोरी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलगा योगेश देवाजी धकाते (वय २५) याला अटक केली आहे. कौटुंबिक वाद पोहचला जीव घेण्या पर्यंत... पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देवाजी धकाते यांचा पालोरा गावाजवळ वीटभट्टीचा व्यवसाय होता. त्यांना पाच मुली व एक मुलगा योगेश आहे. सर्व मुलींचे विवाह झाले असून, वर्षभरापूर्वी योगेशचेही लग्न झाले होते. योगेश हा आपल्या पत्नीसह आई-वडिलांसोबत राहत होता. दरम्यान, देवाजी हे योगेशच्या पत्नीला वारंवार रागावत असत. गर्भवती असतानाही तिला काम करण्यास भाग पाडले जात असल्याने योगेशला याचा राग होता. या कारणावरून पिता-पुत्रांमध्ये सतत वाद होत होते. हाच वाद हळूहळू तीव्र रागात परिवर्तित झाला. दबा धरून बसला होता आरोपी मुलगा... घटनेच्या दिवशी सायंकाळी योगेश हा वडिलांपूर्वीच वीटभट्टीवरून निघून गेला आणि पालोरा गावाजवळील सुनसान ठिकाणी दबा धरून बसला. साडेसातच्या सुमारास देवाजी आपल्या मुलीशी मोबाईलवर बोलत त्या मार्गाने जात असतांना योगेशने अचानक त्यांच्यावर कुऱ्हाडीने सपासप वार केले.



या हल्ल्यात देवाजी गंभीर जखमी झाले. त्यांच्या किंकाळ्या मोबाईलवर दुसऱ्या बाजूला असलेल्या मुलीने ऐकल्या; मात्र अचानक संपर्क तुटल्याने तिला संशय आला. तिने तत्काळ शेजाऱ्यांना याबाबत माहिती दिली.

हत्येनंतर आरोपी योगेशने रक्ताने माखलेली कुऱ्हाड पाण्याने स्वच्छ केली आणि काहीच घडले नाही, अशा आविर्भावात घरी परतला. त्यानंतर तो आई, चुलत भाऊ आणि इतर नातेवाईकांसोबत वडिलांचा शोध घेण्यासाठीही निघाला. काही वेळाने बोगद्याजवळ देवाजी यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. सुरुवातीला वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची चर्चा रंगली होती.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक कैलास गवते यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान योगेशच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. अखेर त्याने वडिलांच्या खुनाची कबुली दिली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक करून पुढील तपास सुरू केला आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कौटुंबिक वाद किती टोकाला जाऊ शकतो याचे हे गंभीर उदाहरण मानले जात आहे.

# माता वासवी कन्याका परमेश्वरी मूर्तीचे प्राणप्रतिष्ठापना..!

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

आर्य वैश्य समाज ,तथा श्री कन्याका परमेश्वरी देवस्थान समिती गडचिरोली यांच्यातर्फे आयोजित श्री माता वासवी कन्याका परमेश्वरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना तसेच महापूजा व महाआरती आमदार तथा माजी मंत्री महाराष्ट्र राज्य मा. श्री. सुधीर भाऊ मुनगंटीवार व त्यांच्या अर्धांगिनी सौ. सपना ताई मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. श्री माता वासवी कन्याका परमेश्वरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापनेला गडचिरोली नगराचे नगराध्यक्ष ॲड. प्रणोती सागर निंबोरकर, नगरसेवक सागर अरुणजी निंबोरकर यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी मा. श्री. सुधीर भाऊ मुनगंटीवार आमदार तथा माजी मंत्री महाराष्ट्र राज्य , सौ सपना ताई मनगंटीवार, गडचिरोली चे लाडके आमदार मिलिंद जी नरोटे, भाजपा जिल्हा अध्यक्ष रमेश जी बारसागडे, महा मंत्री गोविंद जी सारडा, मा. नंदकुमार गादेवार अध्यक्ष महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा, ॲड. प्रणोती सागर निंबोरकर नगराध्यक्ष नगरपरिषद गडचिरोली, श्री.सागर अरुण निंबोरकर नगरसेवक व तसेच या शुभपर्वावर उपस्थित आर्य वैश्य समाज व गावातील नागरिक उपस्थित होते.

# बक्षीस वितरण कार्यक्रम म्हणजे विद्यार्थी कर्तृत्वाचा सन्मान सोहळा

## कु. पायल बांबोळे हिला सत्रातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी हा मानाचा पुरस्कार

**विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम**



देसाईगंज - आदर्श महाविद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण समारंभ नुकताच पार पडला.“बक्षीस वितरण कार्यक्रम हा केवळ पारितोषिकांचा सोहळा नसून विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा आणि त्यांच्या पुढील वाटचालीला दिशा देणारा महत्त्वपूर्ण टप्पा आहे,” असे प्रेरणादायी विचार मा. मोतीलाल कुकरेजा, सचिव नु शि प्र मंडळ यांनी व्यक्त केले. संस्थेद्वारा संचालित आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित वार्षिक बक्षीस वितरण समारंभात विशेष अतिथी म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. पुरस्कार प्राप्त करण्यासाठी परिश्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून महाविद्यालयाद्वारे सातत्याने आयोजित होत असलेल्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. संस्थाध्यक्ष मान. जगदीशजी शर्मा यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला संस्था सहसचिव मा. ओमप्रकाशजी अग्रवाल, सदस्य मा. अब्दूल जहीर शेख, सदस्य मा. संतुमल डोडानी, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा संस्था सदस्य डॉ शंकर कुकरेजा, महा. चे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे, कनिष्ठ महा. चे प्राचार्य मा. दामोधर शिंगाडे, सांस्कृ. विभाग प्रमुख प्रा. डॉ हितेंद्र धोटे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. पदवीचे शिक्षण घेत असतांना विद्यार्थी जेवढे जास्त स्पर्धेत सहभागी होईल तेवढा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल, असे मार्गदर्शन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व संस्था सदस्य डॉ शंकर कुकरेजा यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना बाहेर काढण्याचे काम महाविद्यालयाचे प्राध्यापक सातत्याने करीत आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय तत्पर आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्र २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात विविध विभागाद्वारे आयोजित विविध एकल व समूह प्रकारातील स्पर्धांतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करून गौरवान्वीत करण्यात आले. रा से यो उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रचित सोनवणे ह्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला, तर उत्कृष्ट स्वयंसेविका म्हणून कु. पायल बांबोळे हिला सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्ता व नावीन्यतेसह विविध उपक्रमांमध्ये सर्वांगीण उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कु. पायल बांबोळे हिला सत्रातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी हा मानाचा पुरस्कारही प्रदान करण्यात आला. त्याखालोखाल कु. प्रियंका ठाकरे, सोहम कुंभरे, कु. इशा हर्षे यांनी पुरस्कार पटकावलेत. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ हितेंद्र धोटे यांनी अहवाल वाचनातून महाविद्यालयात सत्रात राबविल्या गेलेल्या राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय कार्यक्रमांबद्दल उपस्थितांना अवगत केले. प्रा. अमोल बोरकर यांनी विजेत्यांची यादी वाचन केले. सूत्रसंचालन प्रा. तेजस आत्राम यांनी केले तर डॉ. निहार बोदेले यांनी आभार मानलेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.


# खा. किरसान यांनी कार्यकर्त्यांच्या व जनतेच्या समस्या जाणून घेतल्या



**विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज - शासकीय विश्राम भवन, देसाईगंज येथे गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी विविध भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्या समस्या, अडचणी तसेच स्थानिक प्रश्न मांडले. खासदार डॉ. किरसान यांनी सर्वांचे प्रश्न ऐकून घेत संबंधित समस्यांचे तात्काळ निवारण करण्याचे आश्वासन दिले.

या प्रसंगी आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदासजी मसराम, देसाईगंज तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेंद्रजी बुल्ले, माजी पंचायत समिती सभापती परसरामजी टिकले, काँग्रेस नगरपालिका गटनेते विकासजी प्रधान, माजी उपसभापती नितीनजी राऊत, नगरसेवक श्यामजी उईके, नगरसेविका आशाताई दहिवले, गुरमितकौर चावला, राधिकाताई पत्रे, मंदाताई समर्थ, हेमीदाताई पठाण, महिला काँग्रेस जिल्हा उपाध्यक्षा आरतीताई लहरी, तसेच वैष्णवी आकारे, आशाताई झोडे, ममीताताई आळे, काँग्रेस तालुका महासचिव दुर्वासजी नाईक, मनोहरजी निमजे, सुरेशजी मेश्राम, गजुजी नाईक, नंदूजी चावला, मनोहरजी खेकारे, राधेश्यामजी पत्रे, हंसराजजी लांडगे, सागरजी वाढई, प्रशांतजी अंकामवार, सुमंतजी मेश्राम, प्रशांतजी किलनाके, रमेशजी पर्वतकार, नरेशजी मेश्राम, लंकेश ढोरे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



» Selected

## जिल्हा प्रभारीपदी नियुक्तीनंतर आमदार डॉ. परिणयजी फुके यांचे गडचिरोलीत आगमन

देसाईगंज : गडचिरोली जिल्हा प्रभारीपदी नियुक्ती झाल्यानंतर आमदार डॉ. परिणयजी फुके यांचे दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी गडचिरोलीत आगमन झाले. यावेळी माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक अभिनंदन करत सन्मानपूर्वक स्वागत केले. डॉ. फुके यांची जिल्हा प्रभारी म्हणून झालेली नियुक्ती ही गडचिरोली जिल्ह्याच्या विकासाला आणि संघटनात्मक बळकटीला नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. त्यांच्या नेतृत्वातून जिल्ह्यातील विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या प्रसंगी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष बाबुरावजी कोहळे, माजी जिल्हा उपाध्यक्ष तथा मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणयजी खुणे, माजी जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भारत खटी, तसेच नगरसेवक व तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष आशिष पिपरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्वागत सोहळ्यामुळे गडचिरोलीत नव्या नेतृत्वाकडून विकासाच्या अपेक्षा अधिक दृढ झाल्या असून, आगामी काळात जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सकारात्मक आणि परिणामकारक वाटचाल होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

---

## जहाल नक्षलवादी रुपी रेड्डी चकमकीत ठार

गडचिरोली : नक्षलवादाच्या विरोधात सुरक्षा दलांनी पुकारलेल्या निर्णायक लढ्याला सोमवारी पहाटे आणखी एक मोठे यश आले. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमावर्ती भागातील नक्षलवाद्यांचे सुरक्षित आश्रयस्थान मानल्या जाणाऱ्या माचपल्लीच्या घनदाट जंगलात झालेल्या चकमकीत जहाल नक्षलवादी रंगाबोईना भाग्या ऊर्फ रुपी रेड्डी (वय ४५) ही ठार झाली. पाच लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या रुपीच्या खातम्यामुळे उत्तर बस्तरमधील नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला असून, तेलंगणा कॅडरचा छत्तीसगडमधील शेवटचा दुवा निखळला आहे. कांकेर जिल्ह्यातील छोटेबेठिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत नक्षलवाद्यांच्या हालचाली वाढल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा पोलीस दल आणि सीमा सुरक्षा दलाच्या संयुक्त तुकडीने रविवारी रात्रीपासूनच या भागात नक्षलविरोधी अभियान तीव्र केले होते. सोमवारी पहाटे ४ च्या सुमारास माचपल्लीच्या जंगलात दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांशी पोलिसांचा आमनासामना झाला.

# प्रशासकीय 'ब्रेक'मुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात!

## बससेवेचा प्रश्न ऐरणीवर; 'डिजिटल इंडिया'च्या काळात पायपीट नशिबी

**विदर्भ केसरी । धानोरा**

विकास आणि डिजिटल क्रांतीच्या गप्पा मारल्या जात असतानाच, गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यातील वास्तव मात्र 'गडद' असल्याचे चित्र समोर येत आहे. धानोरा ते निमगाव आणि गडचिरोली ते निमगाव या महत्त्वाच्या मार्गांवर हक्काची एसटी बस नसल्याने शेकडो विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि रुग्णांचे आरोग्य वाऱ्यावर आहे. वारंवार मागणी करूनही राज्य परिवहन महामंडळाकडून (MSRTC) मिळणारी 'प्रक्रिया सुरू आहे' ही ठराविक उत्तरे म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार असल्याची संतप्त भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

नेमकी अडचण काय? निमगाव परिसरातील शेकडो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी दररोज गडचिरोली आणि धानोरा शहरात येतात. मात्र, बस नसल्याने या विद्यार्थ्यांना एकतर खासगी वाहनांसाठी खिसा रिकामा करावा लागतो किंवा मैलोन्मैल पायपीट करावी लागते.

शिक्षणावर परिणाम: वेळेवर वाहतुकीचे साधन उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

आरोग्याची आणीबाणी: निमगाव भागातून गंभीर रुग्णांना शहरात आणण्यासाठी बस नसल्याने उपचारास उशीर होऊन जीव जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

प्रशासकीय उदासीनता: रस्ते खराब असल्याचे कारण किंवा पुरेसा कर्मचारी वर्ग पुढे करून सेवा टाळली जात असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला आहे.

प्रशासनाची 'रेकॉर्डेड' उत्तरे ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, प्रत्येक वेळी 'प्रक्रिया सुरू आहे' किंवा 'गाड्यांची कमतरता आहे' अशी तांत्रिक कारणे देऊन प्रशासनाने हात झटकले आहेत. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे स्थानिक जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, "आमची सोय कधी होणार?" असा रोकडा सवाल विचारला जात आहे.



### प्रमुख मागण्या....

तात्काळ सेवा: गडचिरोली-निमगाव तसेच धानोरा-निमगाव मार्गावर तात्काळ बस सेवा पूर्ववत करावी. नियोजित फेऱ्या: सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा तीनही सत्रांत नियमित फेऱ्या लावण्यात याव्यात. विद्यार्थी केंद्री नियोजन: धानोरा-निमगाव मार्गावरील बसचे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या शाळा-महाविद्यालयांच्या वेळेनुसार निश्चित करावे. रस्त्याची दुरवस्था किंवा तांत्रिक त्रुटींचे कारण न देता, प्रशासनाने ही सेवा युद्धपातळीवर सुरू करावी, अन्यथा आंदोलनाचा इशाराही परिसरातील जनतेने दिला आहे.

"आम्ही केवळ बस मागत नाही, तर आमच्या मुलांचे भविष्य मागत आहोत. प्रशासनाने तांत्रिक अडचणींचा पाढा वाचण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करून बस सुरू करावी."
संतप्त ग्रामस्थ, निमगाव परिसर

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा 2

## पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शेती शाळेचे आयोजन..!

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

गडचिरोली :- तालुका कृषी अधिकारी गडचिरोली कु. सुप्रिया कलंबरकर यांच्या मार्गदर्शनात कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा 2, आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमातून एक दिवसीय डिजिटल शेती शाळेच्या वर्ग-2 चे आयोजन करण्यात आले होते. शेतीतील वाढत्या उत्पादन खर्चावर आळा घालण्यासाठी व रासायनिक खते व कीटकनाशकांवर पर्याय म्हणून निसर्गातील उपलब्ध असलेल्या नैसर्गिक व सेंद्रिय घटकांचा वापर आपल्या शेतामध्ये वाढवून त्यांचा कार्यक्षमतेने व कुशलतेने उपयोग करून शेतातील वाढत्या उत्पादन खर्चाला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने निसर्ग पूरक शेती करण्याचे धडे या डिजिटल शेती शाळेच्या वर्ग-2 च्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात आले




यामध्ये प्रामुख्याने काळशी सारख्या अतिदुर्गम आदिवासी गावापासून तर खरपुंडी, सावेला, धुंडेशिवनी, रायपुर, मौशीखांब, हिरापूर, येवली, गुरुवळा, बोधली, साखरा, व पोर्ला अशा संपूर्ण तालुक्यातील विविध कानाकोपऱ्यातील गावातील शेतकऱ्यांचा या डिजिटल शेती शाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेती शाळेमध्ये बिजामृत, जीवामृत, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क अशा विविध नैसर्गिक खत व जैविक औषध घरीच तयार करण्याचे धडे यावेळी शेतकऱ्यांना देण्यात आले. व या घटकाच्या मदतीने शेतीची सुपीकता व जैव विविधता टिकवून ठेवण्यासाठी तसेच शेतातील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कशा प्रकारे करावा याचे सविस्तर मार्गदर्शन शेती शाळेच्या माध्यमातून देण्यात आले.

# एकाच परिवारातील तीन बहिणींची पोलीस दलात भरारी!

## कोरची तालुक्यातील खुणारा गावाचा अभिमान!

**विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज - गडचिरोली जिल्हा पोलीस दलात खुणारा येथील एकाच कुटुंबातील तीन बहिणींची निवड होऊन प्रेरणादायी यश संपादन. यात प्रामुख्याने अश्विनी श्यामलाल कुंभरे (वय २७), नूतन श्यामलाल कुंभरे (वय २६) आणि पल्लवी श्यामलाल कुंभरे (वय २४) असे या तिन्ही बघिणींचे नावे आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार श्री. रामदासजी मसराम यांनी त्यांच्या वडिलांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.



ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी आहे. खुणारा गावासह संपूर्ण कोरची तालुक्यात अभिमानाची लाट व आनंदाची लाट दिसून येत आहे. परिसरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे असे देखील पहावयास दिसते. त्या प्रसंगी उपस्थित कॉंग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष कोरची मनोज अग्रवाल, माजी जिल्हा परिषद सदस्य रामसुराम काटेंगे, कॉंग्रेस कमिटी जिल्हा उपाध्यक्ष सदरूभाई भामानी, कॉंग्रेस जेष्ठ नेते विठ्ठल शेंडे, रामदास साखरे, कॉंग्रेस कमिटी सोशल मीडिया तालुकाध्यक्ष वसीम शेख, भावेश मुंगणकर इत्यादी मंडळी उपस्थित होती.

# कार उलटून झालेल्या अपघातात दुचाकीची धडक


## आरमोरी मार्गावर तिघे जखमी..!

**विदर्भ केसरी । आरमोरी**

गडचिरोली - आरमोरी मार्गावरील चुरमुरा ते वसा गावादरम्यान कोलांडी नाल्याजवळ शनिवारी सायंकाळी ७:३० वाजताच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. रस्त्यावर उलटलेल्या कारला दुचाकीने धडक दिल्याने झालेल्या या अपघातात तिघे जण जखमी झाले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक MH३३-AC-२४८१) वडसा येथून गडचिरोलीकडे जात असतांना चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावरच पलटी झाली.

ही कार रस्त्यात आडवी पडलेली असतांनाच, पाठीमागून येणारी हिरो दुचाकी (क्रमांक MH33-AK-१२७५) या कारवर जोरात आदळली. या दुहेरी अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.




या अपघातात दुचाकी चालक प्रशांत भोयर (रा. अडपल्ली) हा गंभीर जखमी झाला आहे. तसेच कारमधील प्रवासी उज्वला पांडुरंग पेसणे (५३, रा. साईनगर, गडचिरोली) या गंभीर जखमी झाल्या असून, पांडुरंग लक्ष्मण पेसणे (६३) यांना किरकोळ दुखापत झाली आहे. घटनेची माहिती मिळताच आरमोरी पोलिसांनी तातडीने धाव घेऊन सर्व जखमींना उपचारासाठी गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

मात्र पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून रस्ता मोकळा केला. सध्या आरमोरी पोलिसांकडून जखमींचे जबाब घेण्याची व पुढील कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. रात्रीच्या वेळी वाहन चालवतांना वेगावर नियंत्रण ठेवावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक कैलास गवते यांनी केले आहे.

## काहीही झालं नाही तरीही मी माफी मागणार नाही

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामरा याने एकनाथ शिंदे यांची माफी मागण्यास मागच्या वर्षीही नकार दिला होता, आताही नकार दिला आहे. कुणाल कामरा हा त्याच्या बेधडक आणि बिनधास्त कॉमेडीसाठी प्रसिद्ध आहे. आत्तापर्यंत कुणाल कामराने अनेकदा अनेक नेत्यांची खिल्ली उडवली होती. दरम्यान मागील वर्षी मार्च महिन्यांत म्हणजेच साधारण १३ महिन्यांपूर्वी कुणाल कामराने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवली आणि त्यावरुन वाद निर्माण झाला. कुणाल कामराविरोधात हक्कभंग आणण्यात आला. तसंच कुणाल कामरा विरोधात एकनाथ शिंदेंची शिवसेना न्यायालयात गेली. कुणाल कामराने मात्र माफी मागणार नाही राजकीय व्यंग करण्याचा प्रत्येला अधिकार आहे असं म्हटलं आहे. १३ महिन्यांपूर्वी नेमकं काय घडलं होतं? माफी न मागण्यावर कुणाल कामरा अजूनही ठाम का आहे?

# मौशिखांब गावात मोहफुलांची अवैध दारू विक्री जोमात पोलीस प्रशासनाच्या कार्यावर महिलांचा संताप..!

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

:- गडचिरोली तालुक्यातील मौशिखांब गावात गेल्या एक वर्षापासून मोहफुलांपासून तयार होणाऱ्या अवैध दारूची सर्रास विक्री सुरू असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. गावातील काही ठिकाणी खुलेआम दारू विक्री होत असून याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या अवैध व्यवसायामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत असून अनेक युवक व्यसनाच्या आहारी जात असल्याने महिलांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौशिखांब गावात काही व्यक्तींकडून मोहफुलांपासून तयार होणारी दारू तयार करून ती खुलेआम विक्री केली जात आहे. या दारू विक्रीमुळे गावातील युवक मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी जात असून,




कुटुंबातील शांतता आणि आर्थिक स्थितीवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. दिवसभर मेहनत करून कमावलेले पैसे दारूत उडवले जात असल्याने अनेक कुटुंबांमध्ये वाद निर्माण होत असल्याचे चित्र गावात पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी गावातील महिलांनी पुढाकार घेत अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी ठाम भूमिका घेतली होती. महिलांनी एकत्र येत दारूबंदी आंदोलन छेडले होते. त्यांच्या या प्रयत्नांमुळे काही काळासाठी गावातील दारू विक्री बंदही झाली होती. मात्र काही दिवसानंतर पुन्हा चोरट्या मार्गाने दारू तयार करून विक्री सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

महिलांनी अनेक वेळा संबंधित यंत्रणेकडे तक्रारी करूनही या प्रकरणात ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली आहे. गावात खुलेआम दारू विक्री सुरू असतानाही पोलीस प्रशासनाकडून प्रभावी कारवाई होत नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या अवैध दारू विक्रीमुळे गावातील युवकांचे भविष्य धोक्यात येत असून, व्यसनाधीनतेमुळे गुन्हेगारी आणि कौटुंबिक वाद वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गावातील महिलांनी पुन्हा एकदा एकत्र येत अवैध दारू विक्री पूर्णपणे बंद करण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन मौशिखांब गावातील अवैध दारू विक्रीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करून गावातील सामाजिक वातावरण सुरक्षित ठेवण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त करत मोठे आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे.







